रे.दिवाणी दावा क्र.४६/२०१५
गौतम वि.लक्ष्मण

## नि.८० वरील आदेश

१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ०६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्त करण्याकरिता दाखल केला आहे. वादीचा दावा वाटपाचा व पृथक कब्जाचा आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये तडजोडीची बोलणी चालु असताना वादीने प्रतिवादी क्र.१ यास रु. १,००,०००/— देण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे वादीने पारा येथील प्रतिष्ठित व्यक्ती भास्कर एकनाथ शिंदे यांच्या जवळ नरहरी लिंबाजी ढेंगळे, राम नरहरी ढेंगळे व शिवाजी विश्वनाथ माने यांचे समक्ष सदरची रक्कम दिली होती व वादीचा हिस्सा तडजोडीने दिल्यानंतर प्रतिवादी क्र.१ यास रक्कम देण्याचे ठरले होते. तोपर्यंत वादीने दाव्यामधील खरेदीदार म्हणजेच प्रतिवादी क्र.३ व ७ च्या मुलांना प्रतिवादी करु नये असे ठरले होते. सदरची रक्कम अकरा महिने मध्यस्थी व्यक्तीकडे ठेवली होती

३. सदरचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रतिवादी क्र.३ व ७ यांच्याशी संगनमत करुन मौजे पारा येथील दावा मिळकतीपैकी काही जमीन प्रतिवादी क्र.३ चा मुलगा अक्षय व प्रतिवादी क्र.७ याने त्याची मुले मनोज व मंगेश यांच्या नावे खरेदीखते करुन दिलेली आहेत. त्यामुळे, खरेदीदारांना सदर दाव्यात प्रतिवादी म्हणुन सामील करण्यासाठी व सदर खरेदीखते वादीवर बंधनकारक नाहीत अशी दुरुस्ती होवुन मिळणेकरीता सदरचा अर्ज दिलेला आहे. तसेच, वादीचे पुढे असे कथन आहे की, सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कसलाही बदल होणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

४. प्रतिवादी क्र.१ याने त्याचे म्हणणे दाखल करुन सदर अर्जातील खरेदीखत क्र.६१९/२०१३ हे दावा देण्यापुर्वी झाले असल्याने सदरचा अर्ज मुदतीत नसल्याच्या कारणावरुन तो अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

५. प्रतिवादी क्र.३ याने त्याचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथनाप्रमाणे वादीने कागदपत्र दाखल केली नसल्यामुळे व सदर दुरुस्तीमुळे मुळ दाव्याच्या स्वरुपात बदल होणार आहे या कारणामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

६. वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा दावा हा वाटपाचा व पृथक कब्जाचा आहे. त्यामुळे, दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी या सर्वांचे हक्क आहेत. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सदरचा दावा प्रलंबित असतना काही मिळकती प्रतिवादी क्र.३ व ७ यांच्या मुलांना विक्री केल्याचे वादीचे कथन आहे. त्यासंदर्भाने वादीतर्फे कोणतेही कागदपत्रे अभिलेखावर दाखल करण्यात आलेले नाहीत.

७. सदर प्रकरणामध्ये वाद मुदद्े निश्चीत झाले असले तरी वादीतर्फे अदयाप पुराव्याचे शपथपत्र दाखल करण्यात आलेले नाही. वादीच्या कथनाप्रमाणे सदरचे खरेदीखते दावा दाखल झाल्यानंतर झाले असल्याने त्याअनुषंगाने प्रस्तुत दाव्यामध्ये दुरुस्ती होणे गरजेचे आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच, प्रतिवादींना देखील सदर दुरुस्तीच्या अनुषंगाने पुरावा देण्याची संधी मिळणार असल्याने त्यांचे देखील कोणतेही नुकसान होणार नाही.

८. सबब, वर नमुद सर्व कारणांस्तव वादीचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित ठरणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# <u>आदेश</u>

अ. वादीचा अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

ब. वादीने सदर दाव्यामध्ये या अर्जाच्या आदेशाच्या तारखेपासुन १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्त करुन दाव्याची दुरुस्ती प्रत त्याच्या प्रतींसह न्यायालयात दाखल करावी.

सही/—

( ध.ता.पाटील )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
वाशी, ता.वाशी.

दि.२७.०९.२०१८